# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दुरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९१३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail,com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/498 दिनांक : ९ मे, २००६

## परिपत्रक क्र. ११२

**विषय:** पाटबंधारे विभागाचा उद्भव असलेल्या पाणी पुरवठा योजनांसाठी पाणी मोजणी यंत्र बसविणेबाबत..

**संदर्भ :** महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग, शासन परिपत्रक क्र.बिपापु-१००१/८७९३/(२००१)/संख्या (धो), दिनांक ७.४.२००३.

पाटबंधारे विभागाकडून बिगर सिंचन पाणी पुरवठयासाठी इलेक्ट्रॉनिक जल प्रवाह मापक बसविण्याचे अनिवार्य केले असून या अनुषंगाने संदर्भिय शासन परिपत्रकान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

१) पाणी वापर यंत्रणेने सदर यंत्र न बसविल्यास, यंत्र न बसविलेल्या कालावधीतील पाणी वापरासाठी वार्षिक मंजूर पाणी कोटयाच्या कालावधीच्या समप्रमाणात पाणी वापराच्या १२५% परिमाणास प्रचलित दराने आकारणी करण्यात येणार आहे.

२) सदर यंत्र ना दुरूस्त असल्यास तसेच ३० दिवसापेक्षा कमी कालावधीत दुरूस्त केल्यास वार्षिक मंजूर पाणी कोटयाच्या कालावधीच्या समप्रमाणात सदरील कालावधीसाठी पाणी वापराच्या ९०% परिमाणास प्रचलित दराने आकारणी करण्यात येणार आहे.

३) सदर यंत्र ना दुरूस्त असल्यास तसेच ३० दिवसापेक्षा कमी कालावधीत दुरूस्त न केल्यास वार्षिक मंजूर पाणी कोटयाच्या कालावधीच्या समप्रमाणात सदरील कालावधीसाठी मीटर ना दुरुस्त कालावधीतील पाणी वापरास ११०% परिमाणास प्रचलित दराने आकारणी करण्यात येणार आहे.

थोडक्यात पाटबंधारे विभागाचा उद्भव असलेल्या मजीप्राशी संबंधित पाणी पुरवठा योजनांसाठी जलमापके बसविणे आवश्यक असून त्याबाबत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) उद्भवापासून पाणी उचलावयाच्या पाईप्सचा व्यास ५०० मि.मी. पर्यंत असल्यास फूल बोअर टाईप इलेक्ट्रोमॅगनेटिक प्रकाराची जलमापके बसवावीत.

२) उद्भवापासून पाणी उचलावयाच्या पाईप्सचा व्यास ५०० मि.मी. च्या वर असल्यास अल्ट्रॉसॉनिक प्रकारचे जलमापके बसवावीत.

३) ज्या ठिकाणी जलमापके बसविणे भौतिकदृष्टया अथवा उद्भवाच्या प्रकारावर अशक्य असल्यास पाटबंधारे विभागाशी संपर्क साधून संबंधित अधिकाऱ्या समवेत प्रत्यक्ष स्थळावर पाहणी करुन कोणती पध्दत अवलंबावी याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

उपरोक्त नमूद केलेल्या जलमापकांचे दर मजीप्राच्या दरसूचीमध्ये समाविष्ठ असून या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी. तसेच उपरोक्त संदर्भिय शासन परिपत्रकामध्ये नमूद केलेनुसार आवश्यक तो करारनामा पाटबंधारे विभागाशी करुन योग्य ती कार्यवाही करावी.

दोमकोंडवार

**( माधव दोमकोंडवार )**
**सदस्य सचिव**

**प्रत :**

१) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, यांना माहितीस्तव सादर.
२) सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मंबई-३२, यांना माहितीस्तव सादर.
३) मुख्य अभियंता, मजीप्रा, ठाणे, पुणे, नाशिक, अमरावती, औरंगाबाद, नागपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.
४) वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई, यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.
५) अधीक्षक अभियंता (सर्व), म.जी.प्रा. मंडळ, यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.
६) कार्यकारी अभियंता (सर्व), म.जी.प्रा. बांधकाम विभाग, यांना माहिती व पुढील कार्यवाहीस्तव.

Apr-06/157